REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ७ जुलै, १९४८ अंक २७

## दि न्यू सिटिझन बँक
### ऑफ इंडिया, लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु.वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कॅडाक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ) ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
( बुधवार चौक )

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह
## बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
| --- | --- | --- |
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**सौराष्ट्रांत घड्याळांचा कारखाना**—भावनगर चेंबर ऑफ कॉमर्सचे सेक्रेटरी, श्री. गुलाबराय गांधी, हे घड्याळांचा धंदा शिकण्यासाठी लवकरच जपानला जाणार आहेत. परत आल्यावर सौराष्ट्रांत एक घड्याळांचा कारखाना काढण्याचा त्यांचा विचार आहे.

**सौराष्ट्रासाठी स्वतंत्र बँक?**—सौराष्ट्रासाठी एक स्वतंत्र बँक काढण्याचें घाटत आहे, असें समजतें. ह्या बाबतींतील शक्याशक्यतेची तपासणी करण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें आपला एक प्रतिनिधी नुकताच त्या प्रांतांत पाठविला होता, असें कळतें.

**इंग्लंडसाठीं जपानचें कापड**—ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें जपानमधून १० कोटी वार कापड आयात करण्यास मंजुरी दिली आहे. त्या कापडाचें अधिक संस्करण झाल्यानंतर तें पाकिस्तान, दक्षिण ऱ्होडेशिआ व ब्रह्मदेश ह्या देशांकडे पुन्हा निर्यात करण्यांत येणार आहे.

**सरकारी बक्षिसाच्या बाँडसच्या चिठ्या**—हिंदुस्थान सरकारच्या ५ वर्षांच्या (१९४९) बक्षिसाच्या बाँडसच्या सहामाही चिठ्या ता. १५ जुलै रोजीं मुंबई येथें सर कावसजी जहांगीर हॉल मध्यें टाकण्यांत येणार आहेत. चिठ्या टाकण्याची हीं नववी खेप आहे.

**हिशेब तपासनिसांसाठी कायदा**—हिंदुस्थान सरकारचें व्यापार खातें हिंदच्या पार्लमेंटांत हिशेब तपासनिसांच्या धंद्याचें नियंत्रण करण्याच्या उद्देशानें एक बिल आणणार आहे. हिंदुस्थानांत ह्या संबंधीं एक स्वतंत्र बोर्ड अगर मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें नुकतीच एक तज्ज्ञांची कमिटी नेमली होती. ह्या कमिटीच्या अहवालाला धरूनच हें बिल तयार करण्यांत आलें आहे. हिशेबतपासनिसांची नोंद ठेवणें, त्यांच्या लायकीचा दर्जा ठरविणें आणि इतर धंदेवाईक नियम करणें, इत्यादि कामें वरील प्रकारच्या संस्थेकडे सोपविलीं जातील.

**सरकारचें २¾ टक्क्यांचें कर्ज**—हिंदुस्थान सरकारच्या १९४८-५२ मुदतीच्या २¾ टक्क्यांच्या कर्जापैकीं जो भाग अद्याप परत द्यावयाचा राहिला आहे तो ता. १५ जुलै, १९४८ रोजीं सरकार परत करणार आहे. ह्या कर्जावर त्या तारखेनंतर व्याज मिळणार नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**टोमॅटोच्या लागवडीला उत्तेजन**—हिंदुस्थान सरकारच्या शेतकी खात्यानें प्रांतिक सरकारांना, स्थानिक संस्थांना आणि संस्थानांना, आपआपल्या भागांत शक्य तेथें टोमॅटोच्या लागवडीला उत्तेजन देण्याविषयीं सूचना केली आहे. प्रांतिक सरकारांना तज्ज्ञांचा सल्ला देण्यालाही मध्यवर्ती सरकार तयार आहे.

**अहमदाबाद रेल्वे स्टेशनाची दुरुस्ती**—अहमदाबादचें रेल्वे स्टेशन बऱ्याच वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. तें पुन्हां नवीन बांधावें असा बूट मध्यंतरीं निघाला होता. परंतु आतां सुमारें ८५ लाख रुपये खर्चून त्याची मोठ्या प्रमाणावर पुनर्घटना करावी, अशी योजना सुचविली गेली आहे. ही योजना सध्यां हिंदुस्थान सरकारच्या स्टँडिंग फायनान्स कमिटीपुढें आहे. अहमदाबादला जाणाऱ्या उतारूंच्या संख्येंत व मालाच्या वहातुकीच्या प्रमाणांत खूप वाढ झाल्यामुळें स्टेशनची पुनर्घटना करण्याची जरूरी भासत आहे. ही योजना मे, १९४७ सालींच तयार करण्यांत आली होती. सर्व योजनेचा खर्च एकदम करणें अशक्य झाल्यास, ती तीन हप्त्यांत पुरी करण्यांत येईल.

**तागाच्या धंद्याला धोका**—तागाच्या गिरण्यांना कच्च्या तागाचा भरपूर पुरवठा होण्याची अनिश्चिति उत्पन्न झाली आहे. तागाच्या गिरण्या १ जुलैच्या सुमारास सुरू होतात. तागाच्या चालू हंगामाचें पीक कमी आलें. शिवाय कलकत्ता व चितगांव येथून तागाची परदेशीं निर्यातही मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळें कलकत्त्यामधील गिरण्यांना तागाची टंचाई पडण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. तागाच्या २५ लाख गांठी ह्या सुमारास शिल्लक असाव्या लागतात, असा अनुभव आहे. पण तितका सांठा शिल्लक रहाणार नाहीं असा अंदाज आहे. अशा परिस्थितींत कच्च्या तागाची परदेशीं होणारी निर्यात थांबविली पाहिजे असें ह्या धंद्यांतील हितसंबंधीयांचें म्हणणें आहे. तागाची निर्यात अशीच चालू राहिली तर बेकारी माजून गिरण्यांनाही आर्थिक धक्का सोसावा लागेल.

**आशिआंतील लोकसंख्या आणि तांदुळाचें उत्पादन**—आशिआ खंडांत जगांतील निम्मी लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. दक्षिण आशिआ आणि पूर्व आशिआ ह्यांत लोकसंख्येची ज्या प्रमाणांत वाढ होते त्या प्रमाणांत तांदुळाच्या उत्पादनाची मात्र होत नाहीं. दुसऱ्या महा-युद्धाच्या काळांत ह्या भागांतील तांदुळाचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर घटलें. जगाच्या पश्चिम गोलार्धांत व आफ्रिकेंत मात्र तांदुळाच्या उत्पादनांत वाढ झाली. पण ती फारशी नाहीं. १९४७-४८ सालांत तांदुळाचें उत्पादन जवळ जवळ युद्धपूर्वकालाइतकें होऊं लागलें. तरी पण १९३४ ते ३८ ह्या कालखंडांत आशियांतून जितका तांदूळ निर्यात होऊं शकला त्याच्या ४० टक्केच ह्या वर्षी निर्यात होऊं शकेल. तांदुळाच्या उत्पादनांत झालेल्या ह्या घटीमुळें जगाच्या अन्नविषयक अर्थव्यवस्थेवर बराच प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**विमा-एजंटांचे परवाने**—विमा-एजंटांचे परवाने दरवर्षी नवीन देण्याऐवजीं दर तीन वर्षांनीं देण्यांत यावे, अशा एका सूचनेचा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुरन्स विचार करीत आहे. ह्या तीन वर्षे चालणाऱ्या परवान्यांची फी ५ रु. ठेवण्यांत येईल. सूचना स्वीकारली गेली, तर त्या अनुरोधानें विमा-कायद्याखालील नियमांत दुरुस्ती करावी लागेल.

**अहमदाबादच्या गिरण्यांना कापसाची टंचाई**—अहमदाबादच्या गिरणी मालकांनीं मध्यप्रांत, खानदेश वगैरे प्रांतांतून हजारो गांठी कापूस खरेदी केला आहे. परंतु वहातुकीच्या अडचणीमुळें त्यांच्या हातीं तो पडलेला नाहीं. कांहीं थोड्या दिवसांत गिरण्यांना कापसाचा पुरवठा झाला नाहीं तर त्यांना उत्पादन कमी करावें लागेल.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ७ जुलै १९४८

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.





प्रो. वा. गो. काळे

# शेतकऱ्यांस पैशाचा पुरवठा

## प्रांतिक बँकेच्या घटनेंत व कार्यक्षेत्रांत क्रांतिकारक बदल

### जिल्हा बँकांवर मध्यवर्ती नियंत्रण

प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या "शेतकी अर्थव्यवहार" समितीनें ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनची योजना सुचविली होती. अशी एखादी सरकारी संस्था शेतकऱ्यांस पैसा पुरविण्याचें कार्य जितकें करील तितकें करण्याची सहकारी संस्थांची तयारी असून, याप्रित्यर्थ सहकारी संस्था, विशेषतः बँका, यांची पुनर्घटना किती व कशी करावी हें सरकारनें एक समिति नेमून निश्चित करावें, असा मुं. प्रां. स. बँकांच्या मंडळानें ठराव केला. या ठरावानुसार सरकारनें सर मणीलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. नानावटी समितीची मूलभूत शिफारस मुं. प्रां. स. बँकेस मध्यवर्ती मानून पुढील व्यवस्था व कारभार करावा अशी आहे. ह्या सहकारी मंडळाचें कार्य व प्रगति, सहकारी मंडळ्या व जिल्हा बँकांचे संबंध, जिल्हा बँकांची कार्यपद्धति व विस्तार या सर्व बाबी प्रांतिक सहकारी बँकेचे अधिकारक्षेत्रांत आल्या म्हणजेच इष्ट कार्य घडून येईल, असा या समितीचा अभिप्राय आहे.

ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनचें काम या प्रांतांतील सहकारी चळवळीनें हातीं घ्यावें, हें काम व्यवस्थित व सूत्रबद्ध करण्याकरितां मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची, मुख्यतः जिल्हा बँकांची संघटित बँक अशा तऱ्हेची पुनर्घटना करावी व या पुनर्घटित प्रांतिक बँकेकडून जिल्हा मध्यवर्ती बँकांचें मार्गदर्शन व्हावें, हें काम यशस्वी होण्याकरितां लागणारें आर्थिक व इतर सहाय्य प्रांतिक व इतर सहकारी संस्थांना सरकारनें पूर्णपणें द्यावें, अशा अर्थाचा ठराव महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेनें जानेवारी १९४८ मध्यें केल्याचें वाचकांस स्मरत असेलच. मुंबई सरकारनें नानावटी कमिटीची शिफारस व सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनीं एकसूत्री कारभारास दिलेली साधारण मान्यता ह्यांच्या आधारावर मुंबई प्रांतिक सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँका ह्यांच्या पुनर्घटनेबाबत आतां हुकूम काढले आहेत. त्यांचेकडे, सहकारी चळवळीशीं संबंध असणाऱ्या सर्वांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. सबंध मुंबई प्रांतांतील सर्व लायक पतवाल्या शेतकऱ्यांना भांडवलपुरवठा करण्याची जबाबदारी पुनर्घटित प्रांतिक बँकेकडे येणार आहे, आणि त्या दृष्टीनें तिची पुनर्घटना केली जाईल. तिच्या डायरेक्टर बोर्डाची नियोजित घटना खालीं दिली आहे.

| | | जागा |
|---|---|---|
| १ | मध्यवर्ती बँकांचे प्रतिनिधी ( अहमदाबाद, भडोच, सुरत, पू. खानदेश, सोलापूर, पुणें, विजापूर, कर्नाटक, बेळगांव, कानडा, प्रत्येकीं एक ) | ८ |
| २ | शेतकी पतपेढ्यांचे प्रतिनिधी ( जेथें प्रांतिक बँक मध्यवर्ती बँक म्हणून काम करतें अशा जिल्ह्यांसाठी. नाशिक, प. खानदेश, अहमदनगर, सातारा, ठाणें–कुलाबा, खेडा, पंचमहाल–अहमदाबाद, प्रत्येकीं एक ) | ७ |
| ३ | बँकिंग युनियन्स व भांडवल पुरविणाऱ्या इतर संस्थांचा प्रतिनिधी ( वाढा, कलोल–हलोल, पू. पंचमहाल, बार्शी सें. बँक ) | १ |
| ४ | मुं. प्रां. स. मार्केटिंग सोसायटीचा प्रतिनिधी | १ |
| ५ | अर्बन बँकांचे प्रतिनिधी ( गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक प्रत्येकीं एक व मुंबई एक ) | ४ |
| ६ | व्यक्तिगत भागीदारांचे प्रतिनिधी | ५ |
| ७ | सरकारनें नियुक्त केलेले ( एक बँकिंग व आर्थिक तज्ज्ञ ) | ३ |
| ८ | मॅनेजिंग डायरेक्टर ( अधिकारपरत्वें ) | १ |
| | एकूण | ३० |

अशा रीतीनें डायरेक्टरांची संख्या ३० झाली तरी दैनंदिन व्यवहाराच्या सोईसाठी चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर व पांच इतर डायरेक्टर ह्यांची एक कार्यकारी कमिटी नेमण्यांत येईल. प्रांतिक बँकेस मध्यवर्ती जिल्हा बँका व युनियन्स ह्यांचेवर देखरेख करण्याचा अधिकार दिला जाईल. मध्यवर्ती जिल्हा बँकांचीहि पुनर्घटना करून, सर्वांची घटना एकाच पद्धतीवर आणण्यांत येईल आणि त्यांच्या डायरेक्टरांपैकीं किमान निम्मे डायरेक्टर सक्षम सहकारी संस्थाचे प्रतिनिधी असावेत अशी योजना केली जाईल.

प्रांतिक सहकारी बँकेचें जेवढें भांडवल व्यक्ती व सहकारी सोसायट्या ह्यांनीं घेतलें असेल, तितक्या रकमेपर्यंतचे शेअर्स प्रांतिक सरकार घेऊन भांडवल पुरविण्याच्या ह्या नव्या संघटनेस सहाय्य करील. ५० लक्ष रुपयांचेपेक्षा जास्त भांडवल घेण्याची जबाबदारी मात्र सरकारवर नाहीं. प्रांतिक बँक मध्यवर्ती जिल्हा बँकांचे व बँकिंग युनियन्सचेहि शेअर्स घेईल. ह्या संस्थांच्या भागीदारांचें जेवढें भांडवल असेल, तितक्या रकमेपर्यंत प्रांतिक बँक शेअर्स घेऊं शकेल. परंतु, कोणत्याहि बँकेचे किंवा बँकिंग युनियनचे ५ लक्ष रुपयांपेक्षा अधिक रकमेचे शेअर्स ती घेणार नाहीं आणि एकूण २५ लक्ष रुपयांपेक्षा अधिक रक्कम अशा शेअर्समध्यें गुंतवणार नाहीं. अशा रीतीनें शेअर्स घेण्यासाठीं, प्रांतिक सरकारकडून प्रांतिक बँकेस ३% दरानें २५ लक्ष रुपयांपर्यंत रकम मिळूं शकेल.

ज्या ठिकाणीं सध्यां इंपीरिअल बँकेकडे सरकारी ट्रेझरीचें काम दिलेलें नाहीं, अशा ठिकाणीं प्रांतिक बँकेच्या शाखांस किंवा मान्यता दिलेल्या मध्यवर्ती बँकांस व बँकिंग युनियन्सना हें काम देण्याचा सरकारचा विचार आहे. रिझर्व्ह बँकेशीं ह्याबाबत सरकार चर्चा करून निश्चित काय तें ठरवील. कर्जाच्या अर्जांचा विचार सत्वर व्हावा व तीं लवकर दिलीं जावीं ह्यासाठी बँकांच्या शाखांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

## आग्नेय आशिआच्या आर्थिक उन्नतीचीं साधनें

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आशिआ आर्थिक समितीचें तिसरें अधिवेशन उटकमंड येथें नुकतेंच भरलें होतें. आशिआंतील जनतेचे आर्थिक प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीनें ह्या अधिवेशनांत उपयुक्त कार्य करण्यांत आलें. आशिआचें औद्योगीकरण करण्यासाठी पुढारलेल्या यंत्र–तंत्र–विशारद राष्ट्रांनीं मदत करणें अनेक दृष्टीनें उचित असलें तरी, खुद्द आशिआंतील नैसर्गिक साधन–संपत्तीचा आढावा घेऊन आशिआ–खंडाला स्वतःच्या पायावर उभें रहाणें कितपत शक्य आहे, ह्याचाही विचार झाला पाहिजे.

आग्नेय आशिआ आणि अतिपूर्वेकडील आशिआ ह्या भूभागांत जगांतील अर्धी लोकसंख्या रहात आहे. ह्या भागांतील लोकांचें जीवन मुख्यतः शेती, खनिजांचें उत्खनन आणि व्यापार ह्या तीन बाबींवर आधारलेलें आहे. तथापि, कांहीं वस्तू निर्माण करण्याची नैसर्गिक मक्तेदारीच येथील जनतेला मिळाली आहे. उदा. कच्चा ताग, कच्चें रेशीम, कच्चें रबर, गळिताचीं धान्यें, जनावरांचीं कातडीं, लाख इत्यादि वस्तू. खनिज पदार्थांत टिन, अभ्रक, मँगेनीज, क्रोम आणि टंगस्टन हे पदार्थ मुख्यतः ह्याच भूभागांत मोठ्या प्रमाणावर निर्माण केले जातात. ह्याच भागांत जगांतील तांदुळाच्या उत्पादनापैकीं ९२ टक्के तांदूळ, ९६ टक्के चहा व ३८ टक्के उंसाची साखर निर्माण होते.

जावा, सुमात्रा, चीन, फोर्मोसा, कोरिया, इंडोचायना, इत्यादि ह्या भागांतील देशांशीं हिंदुस्थानचा सांस्कृतिक व आर्थिक संबंध ३ हजार वर्षांपूर्वीपासूनचा जुना आहे. ह्या देशांतून होणाऱ्या निर्यातींत हिंदुस्थानचा वांटा २३·६ टक्के आहे, आणि आयातींत ३२·३ टक्के आहे. पूर्व आफ्रिका खंडांतील देश आणि अतिपूर्वेकडील देश ह्यांच्या दरम्यानची भौगोलिक स्थिति हिंदुस्थानास लाभली असल्यामुळें ह्या व्यापारी संबंधाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. आशिया खंडांतील देशांत जपान औद्योगिक दृष्ट्या बराच पुढारलेला असून, आशियांतील राष्ट्रांना भांडवली स्वरूपाचा माल पुरवूं शकेल असा आहे. हिंदुस्थानला आशियांतील इतर राष्ट्रांना भांडवली स्वरूपाचा माल पुरवितां येणें शक्य नसलें तरी ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू पुरवितां येण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ कापड, मनुष्यबळाबरोबरच आग्नेय व अतिपूर्व आशियांत नैसर्गिक संपत्तिसाधनेंही विपुल आहेत. कच्चा ताग आणि कच्ची लाख ह्या दोन्ही वस्तू जगांत इतरत्र पैदाच होत नाहींत. चहाचीही जवळ जवळ अशीच स्थिती आहे. कच्चा तागाचें पीक साधारणपणें दरवर्षी १ कोटी गांठी इतकें होतें. एका गांठींत ४०० पौंड ताग असतो. कच्ची लाख जवळ जवळ ११ लाख हंड्रेडवेट उत्पन्न होते. १९३९ सालीं कच्च्या रबराचें उत्पादन ९ लाख, ८४ हजार मेट्रिक टन इतकें झालें, म्हणजे त्या सालांतील कच्च्या रबराच्या उत्पादनाच्या ९७ टक्के उत्पादन जगाच्या ह्या भागांत झालें. १९३९ सालीं जगांतील एकंदर चहाचें उत्पादन ११० कोटी पौंड झालें. त्यांपैकीं १०५ कोटींवर पौंड चहा आशियाच्या वरील भागांत उत्पन्न करण्यांत आला. गळिताचीं धान्यें जगाच्या ह्या भागांत इतर भागांपेक्षा सर्वांत अधिक उत्पन्न होतात. जगांतील तांदुळाच्या उत्पादनापैकी ९० टक्के तांदूळ ह्याच भूभागांत उत्पादन केला जातो. तंबाखूच्या एकंदर ५२० कोटी पौंड उत्पादनापैकीं २५० कोटी पौंड ह्याच देशांत निर्माण होते. कच्चें रेशीम जगांत ६१,२०० मेट्रिक टन्स निर्माण होतें. त्यांपैकी ५५,५०० मेट्रिक टन ह्याच देशांतून तयार होतें. खनिज संपत्तीपैकी टिन ही एक महत्त्वाची वस्तू आहे. जगाच्या एकंदर उत्पादनापैकीं ६६ टक्के टिन आशिआंतील देशांतून उत्पन्न होतें. ह्याशिवाय शिसें, अँटिमनी, पेट्रोलिअम, टंगस्टेन इत्यादि खनिज द्रव्यें ह्या देशांत पैदा होतात. टंगस्टन ह्या खनिजाची उत्पत्ति तर फक्त चीनमध्येंच होते.

आशिआंतील देशांपैकीं जपान, हिंदुस्थान आणि चीन हीं तीनच राष्ट्रें औद्योगिक दृष्ट्या त्यांतल्या त्यांत पुढारलेलीं आहेत. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळांत जपाननें लक्षांत भरण्यासारखी औद्योगिक प्रगति केली, व जपानी मालाची स्पर्धा पाश्चिमात्य देशांनाही होऊं लागली. हिंदुस्थाननेंही ह्या काळांत आपली औद्योगिक प्रगति करून घेतली. चीनची औद्योगिक प्रगति मात्र आपसांतील यादवीमुळें अडून राहिलेली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारांत आशिआंतील ह्या राष्ट्रांचा मोठा भाग आहे. जगाच्या १९३८ सालांतील निर्यात व्यापारांत ह्या देशाचा वाटा १२ टक्के व आयातींत ११·८ टक्के होता. १९३८ सालच्या देशांच्या व्यापाराचा विचार केला तर असें दिसून येतें कीं हे देश कच्चा माल निर्यात करीत आणि पक्का माल आयात करीत. पक्क्या मालाच्या आयातींत भांडवली स्वरूपाचा माल व ग्राहकांना लागणारा माल अशा दोन्ही प्रकारचे माल दिसून येतात. वरील बाबतींत जपान तेवढा अपवाद आहे. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, कांहीं विशिष्ट वस्तूंच्या व्यापारामुळेंच त्या त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारचें वळण लागलेलें आहे. उदा० हिंदुस्थानांतून कच्चा कापूस, कच्चा ताग, कच्ची लोकर, गळिताचीं धान्यें, लाख, चहा, अभ्रक व मँगेनीज इत्यादि माल प्रामुख्यानें निर्यात होतो. सिलोनमधून खोबरें, चहा व रबर निर्यात होतात. ब्रह्मदेशांतून तांदूळ, पेट्रोलिअम व इमारती लाकूड निर्यात होतें. मलायाचा व्यापार मुख्यतः टिन व रबर ह्यांच्या निर्यातीवर अवलंबून आहे. इंडोनेशिआंतून रबर, साखर, पेट्रोलिअम व गळिताचीं धान्यें निर्यात होतात. इंडोचायना व सयाममधून मुख्यतः तांदूळ निर्यात होतो. फिलिपाइन्समधून, साखर, खोबरें, तंबाखू व मॅनिला हेम्प हा माल निर्यात होतो. चीनमधून मात्र बऱ्याच प्रकारचा माल निर्यात होतो. मनुष्यबळ आणि नैसर्गिक संपत्ति ह्या दोन्ही बाबतींत संपन्न असलेला हा भूभाग योग्य रीतीनें उद्योगप्रधान बनला तर तेथील जनतेचे आर्थिक प्रश्न झपाट्यानें सुटूं शकतील.

## सहकारी कानूंत दुरुस्ती

**इन्स्टिटयूटच्या शिक्षण फंडास सोसायट्यांची देणगी**

मुंबई सहकारी कानूंतील एका दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या २४ जूनच्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. त्याअन्वयें, मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या शिक्षण फंडाला सोसायट्यांनीं किती रक्कम द्यावी, हें निश्चित करण्यांत आलें आहे. त्यासंबंधांत कोणास सूचना करावयाच्या असल्यास, त्या १ ऑगस्टपूर्वी सरकारकडे केल्या पाहिजेत.

**हिंद–पाकिस्तान हुंडणावळीचा दर**

१ जुलैपासून रिझर्व्ह बँक पाकिस्तानी रुपयांची खरेदी-विक्री खालील दरानें करूं लागली आहे:—

| | |
|---|---|
| खरेदी : | ९९$\frac{३१}{३२}$ |
| विक्री : | १००$\frac{१}{३२}$ |

किमान १ लक्ष रुपयांचा व्यवहार एका वेळीं केला जाईल. शेड्यूल्ड बँकांनीं पाकिस्तानी रुपयांची खरेदी-विक्री खालील दरानें करावयाची आहे:—

| | |
|---|---|
| खरेदी : | ९९$\frac{१५}{१६}$ |
| विक्री : | १००$\frac{१}{१६}$ |

## स्फुट विचार

### गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस सहकारी संस्थांचा हातभार

राष्ट्राध्यक्ष, श्री. राजेंद्रप्रसाद, ह्यांनीं गांधी राष्ट्रीय स्मारक निधीसंबंधीं एक प्रकट विनंतिपत्रक काढलें आहे, त्याचेकडे सहकारी संस्थांचें लक्ष आम्हीं वेधतों. महात्माजींचें विधायक राष्ट्रोद्धारक कार्य सतत चालू ठेवण्याचे दृष्टीनें वरील निधी जमविण्यांत येत आहे. फंडाच्या रकमेचा मोठा भाग ज्या प्रांतांत किंवा संस्थानांत रकम जमा होईल, त्यांसाठी राखून ठेवण्यांत यावयाचा आहे. विधायक कार्याच्या एकाद्या विशिष्ट बाबीकडे आपल्या देणगीचा विनियोग करण्यांत यावा, अशी अट देणगी देणारे घालूं शकतील. सहकारी कायद्याप्रमाणें, इन्स्टिटयूटच्या संमतीनें कलम ३९, पोटकलम (२) ह्यामध्यें ठरविलेल्या रकमा गंगाजळीमध्यें जमा केल्यानंतर कोणत्याहि मंडळीला आपल्या निवळ नफ्यापैकीं २०% पेक्षा ज्यास्त नाहीं इतकी रक्कम निराळी काढून ठेवतां येते आणि अशा साठलेल्या रकमेचा कोणत्याहि सार्वजनिक किंवा सहकारी कामासाठीं किंवा चॅरिटेबल एन्डौमेंट्स ॲक्टाच्या कलम २ मधील व्याख्येमध्यें सांगितलेल्या 'धर्मादाय कार्यासाठीं' देणगी देण्याकडे उपयोग करतां येतो. गांधी राष्ट्रीय स्मारक निधीचें स्वरूप आणि त्याची संघटना लक्षांत घेतां, सहकारी मंडळयांना ह्या फंडास हातभार लावण्यास अडचण वाटण्याचें कारण नाहीं. आपल्या देणगीचा योग्य उपयोग होईल, अशा विश्वासानें सहकारी संस्थांनीं गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस देणग्या द्याव्या व महात्माजींच्या स्मारकामध्यें सहभागी होण्याचें श्रेय मिळवावें. ह्या फंडास देणगी देण्यास हरकत नाहीं, असें एकादें सर्क्युलर सहकारी खातें किंवा इन्स्टिटयूट ह्यांनीं काढल्यास सोईचें होणार आहे. सहकारी संस्थांनीं आपल्या सभासदांकडून व्यक्तिशः देणग्या जमा करून त्या आपल्या सोसायटीमार्फत वरील फंडाकडे पाठविणेंहि श्रेयस्कर होईल.

---

### हिंदुस्थान-अमेरिका जकात करार

१९४७ च्या ऑक्टोबरमध्यें जिनीव्हा येथें ठरल्याप्रमाणें, अमेरिकेनें हिंदी मालाच्या आयातीस व हिंदुस्थानानें अमेरिकन मालाच्या आयातीस द्यावयाच्या सवलतींचा तपशील जाहीर झाला आहे. ताग व तागापासून केलेला माल, कपास-कापड, काजू, अभ्रक, क्रीडासाहित्य, गालिचे, चहा, तंबाखू, इत्यादींच्या सुमारें २८३/४ कोटी रुपयांच्या हिंदी मालास अमेरिकन सवलतींचा फायदा मिळणार आहे. ह्या उलट, दूध व दुधाचे पदार्थ, डब्यांतील फळें, कांहीं रसायनें व रंग, यंत्रसामुग्री, रेडिओ, टाइपरायटर्स, कच्चें रेशीम, खतें इत्यादि ९ कोटी रुपयांच्या अमेरिकन मालाच्या हिंदुस्थानांतील आयातीस हिंदी जकातींत सवलत मिळेल. अमेरिकन सरकारनें प्रस्तुत कराराच्या अंमलबजावणीची जरूर ती कायदेशीर तजवीज पुरी केली आहे. हिंदुस्थान सरकारहि आतां लवकरच आवश्यक तो जाहीरनामा काढेल व कायदे करून घेईल.

---

**संघराज्याच्या घटनेच्या मसुद्याचें हिंदी भाषांतर**—हिंदी संघ-राज्याच्या नव्या मूळ इंग्रजी भाषेंतील घटनेचा हिंदी तर्जुमा करण्याचें प्रचंड काम मध्यप्रांत कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. गुप्ता आणि सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ डॉ. रघुवीर ह्यांनीं सहा महिने परिश्रम करून नुकतेंच पार पाडलें. ह्या भाषांतरित पुस्तकाची पृष्ठसंख्या १७५ असून शेवटीं इंग्रजी शब्दांना हिंदी प्रतिशब्द देणारा शब्दकोशही जोडण्यांत आला आहे. पुस्तकाची पहिली आवृत्ति १० हजार प्रतींची काढण्यांत येणार आहे.

---

### वेस्टर्न इंडियाच्या अहवालांतील कांहीं आकडे

(३१-१२-४७ अखेर पुरें झालेलें वर्ष)

| | |
|---|---|
| आलेले विमाअर्जः— | २,४९,५१,०७९ रु. |
| पुरें केलेलें कामः— | २,२१,५८,८२९ रु. |
| आयुर्विमा निधींत भरः— | ५०,१९,३३२ रु. |
| निधीची झालेली रकमः— | ३,२५,३६,८३६ रु. |
| कंपनीजवळील रोखे | २,९०,३९,३९२ रु. |
| त्यांची बाजारभावानें किंमतः— | २,९८,८८,४३० रु. |
| अनुकूल तफावत | ८,४९,०३८ रु. |
| डिव्हिडंडः— | १०% कर माफ |

१९४७ सालीं कंपनीस पहिल्या वर्षाच्या हप्त्यांच्या पोटीं १०,११,५९४ रु. मिळाले, आणि वार्षिक हप्त्यांचें उत्पन्न ५१,२७,१२४ रु. झालें. व्याज, डिव्हिडंड व भाडें ह्यांचें ठोक उत्पन्न १४,०२,५२० रु. भरलें. शेअर्स व इन्व्हेस्टमेंट विक्रीवर २,५३,९३४ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडांतून ५,५९,४५७ रु. रेव्हेन्यू अकौंटमध्यें वर्ग केले, त्याचप्रमाणें ६९,९९० रु. इन्कमटॅक्स तरतूद वर्ग केली.

रीइन्शुअरन्स वजा जातां ६,२७,२५९ रुपयांचे मृत्यूचे व १०,४४,३२६ रुपयांचे पूर्ण मुदतीचे क्लेम्स लागू झाले. एजंटांचें कमिशन, भत्ता व कमिशन, पगार खर्च, व्यवस्था खर्च, झीज, इत्यादि सर्व खर्च टाकल्यावर लाइफ इन्शुअरन्स फंडांत ५०,१९,३३२ रुपयांची भर पडून तो ३१/४ कोटी रुपयांवर गेला.

कंपनीनें एकूण ३३ लक्ष, ३५ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. त्यापैकीं ११३/४ लक्ष रुपये घरांचे तारणावर असून २१३/४ लक्ष रुपये कंपनीचे पॉलिसींच्या तारणावर दिलेले आहेत. कंपनीच्या इनव्हेस्टमेंटची ताळेबंदांत दिसणारी किंमत २,९०,३९,३९२ रु. असली, तरी तिचेपेक्षा बाजारभावानें येणारी किंमत ८,४९,०३८ रुपयांनीं ज्यास्त आहे. इमारतखातीं ४,९८,४२० रु. आहेत.

श्री. वा. ग. चिरमुले हे अध्यक्ष असून डॉ. मो. ना. आगाशे हे चेअरमन आहेत आणि श्री. कृ. ग. जोशी, बी. ए., एफ. आय. ए. (लंडन) हे मॅनेजर आहेत.

---

### रेल्वे भाडें

रेल्वेच्या सर्वांत खालच्या वर्गाच्या उतारूंच्या भाड्याचे दर काय आहेत, हें खालील तक्त्यावरून समजून येईलः—

| देश | भाडें (पै) |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | २६·१७ |
| अमेरिका | १६·०३ |
| कॅनडा | २२·११ |
| ऑस्टेलिआ (पश्चिम) | १०·८८ |
| „ (कॉमनवेल्थ) | १०·३५ |
| „ (क्वीन्सलंड) | ८·३५ |
| रशिया | २२·०० |
| हिंदुस्थान | ५·०० |

**हिंदी रेल्वे उतारूंच्या भाड्याचें उत्पन्न**

(१९४६-४७)

| वर्ग | लक्ष रुपये |
|---|---|
| पहिला | २८७ |
| दुसरा | ५७१ |
| इंटर | ३९२ |
| तिसरा | ४४९६ |
| | ५७४६ |

### निजाम सरकार धारण करीत असलेले हिंदी रोखे

एकाच्या नांवावर असलेले जे सरकारी रोखे दुसऱ्याच्या नांवावर वर्ग केल्यामुळें हिंदुस्थानच्या हितसंबंधांस बाध येईल, अशा विशिष्ट रोख्यांची ट्रॅन्स्फर नियंत्रित करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें एक ऑर्डिनन्स काढून स्वतःकडे घेतला आहे. हैद्राबाद सरकार स्वतः धारण करीत असलेले किंवा त्याच्या वतीनें धारण होत असलेले रोखे आणि हैद्राबाद स्टेट बँक धारण करीत असलेले रोखे हिंदी मध्यवर्ती सरकारच्या संमतीशिवाय ट्रॅन्स्फर होऊं शकणार नाहींत. सुमारें ९० ते १०० कोटी रुपयांच्या रोख्यांस हा ऑर्डिनन्स लागू होत आहे. रोख्यांवरील व्याज मात्र दिलें जाईल. हैद्राबादनें आपल्या पैशाचा विनियोग युद्धसाहित्याच्या खरेदीकडे चालविला आहे आणि त्याचें तस्यांत रूपांतर होणें अपरिहार्य आहे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे.

### पाकिस्तानची कापसाची निर्यात

पाकिस्तानांतील कापसाच्या पिकाचा हंगाम आतां संपत आला आहे. ह्या हंगामांत पाकिस्तानांत १० लाख गाठी कापूस पिकला असावा असा अंदाज आहे. प्रत्येक गाठींत ४०० पौंड कापूस असतो. ह्या उत्पादनापैकी ९ लाख गाठी कापूस पाकिस्तानांतून निर्यात करण्यांत येईल असें वाटतें. १५ एप्रिल, १९४८ पर्यंत पाकिस्तानांतून पुढीलप्रमाणें कापसाची देशवार निर्यात झाली.

( गाठ : ४०० पौंडाची )

| | |
|---|---|
| हिंदी संघराज्य | २,५०,००० |
| रशिया | १,२०,००० |
| बेल्जम | ६०,००० |
| इंग्लंड | ४०,००० |
| स्पेन | ३०,००० |
| इटली | २०,००० |
| अमेरिका | ८,००० |

वरील आकड्यांवरून हिंदुस्थानच्या खालोखाल रशिआनें पाकिस्तानकडून कापूस घेतला असल्याचें दिसून येतें. रशिआनें कापसाच्या जागतिक व्यापारांत नव्यानेंच प्रवेश केला आहे. त्या मानानें त्याची प्रगति लक्षांत भरण्यासारखी आहे.

### लोकमान्य इंडस्ट्रीज लि., पुणें

वरील कंपनीचें काम चालू होण्यास आवश्यक तेवढे शेअर अर्ज तिचेकडे आले असून, तिनें शेअर्सची अलॉटमेंटहि नुकतीच केली आहे.

### उसाच्या पिकास बक्षिसें

डेकन कॅनॉल व लिफ्ट इरिगेशन क्षेत्रांत उसाचें दरएकरी उत्पादन वाढावें ह्या दृष्टीनें दि डेकन शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोसिएशननें दोन बक्षिसें ठेवलीं आहेत. दर एकरीं १०० टनांपेक्षा अधिक पीक काढणारांपैकी पहिल्या नंबरला १,००० रुपयांचें बक्षीस आहे, आणि दुसरें दर एकरीं ११ टनांपेक्षा अधिक साखर काढणारांतील पहिल्या नंबरासाठी आहे.

### पाकिस्तानला हिंदी साखरेची गरज नाहीं

पाकिस्तानला ह्यापुढें हिंदी महाग साखर घेण्याची आवश्यकता भासणार नाहीं. हिंदी साखरेस शेरास १ रु. २ आ. किंमत पडते, तर ब्राझीलची साखर ९ आणे दरानें मिळूं शकते, क्यूबाची साखर १० आणे शेर आहे.

### कागदाचे कारखाने

कारवार जिल्ह्यांत बांबूपासून लगदा व कागद करणारे कारखाने काढण्यास मुंबई सरकार परवाने देणार आहे. त्यासाठी दोन महिन्यांचे आंत अर्ज करावेत.


## दि डेकन पॉटरीज ॲण्ड अलाइड इंडस्ट्रीज, लि.

रजिस्टर्ड ऑफिसः—१९६।३९, सदाशिव पेठ, पुणें २

कारखानाः—चिंचवड ( जी. आय्. पी. रेल्वे ) पुणें शहराजीक. तारेचा पत्ताः—"पॉटर्स", पुना.

चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती.

★ कंपनी कपबशा, बरण्या, फायर ब्रिक्स, कौलें वगैरे नित्योपयोगी माल तयार करण्याकरितां स्थापन झाली आहे.

★ कंपनीच्या जागेंत कारखान्याची इमारत, भट्टी, चिमणी व गोडाऊन बांधून पुरें झालें आहे.

★ कच्चा माल कारखान्यांत आलेला असून मशिनरी बसविण्याचें काम सुरू आहे.

**मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी, पुणें २.**

मॅनेजिंग एजन्टस्.

शेअर्स वगैरे माहितीकरितां कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसशीं पत्रव्यवहार करावा.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर ( बेलापूर रोड ) (५) ओझर ( जि. नाशिक ) व ऑफिस-खोपोली ( जि. कुलाबा )

चेअरमन— श्री. के. वि. केळकर, एम्. ए. एलएल. बी., वकील

ठेवी—चालू खातीं पाव टक्का, सेव्हिंग्ज् दीड टक्का, सेव्हिंग्ज् ( श्री खातेदार ) २ टक्के. कायमठेवी मुदत महिने ६ ते ५ वर्षे : व्याज २॥ टक्के ते ४ टक्के पर्यंत.

सेव्हिंग्ज् खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात. शॉर्ट टर्म डिपॉझिटस स्वीकारली जातात. बँकेच्या मुख्य कचेरींत श्री खातेदारांसाठीं स्वतंत्र खिडकीची व्यवस्था.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साठेकर बी. ए. एलएल. बी.
नी. ना. क्षीरसागर.
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## विक्रेत्यांची तेजी आतां ओसरूं लागली काय?

( भा. म. काळे )

दुसरें महायुद्ध संपण्यापूर्वींच मरहूम इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ प्रो. कीन्स यांजकडून युद्धोत्तर जगामध्यें कांहीं काळपर्यंत विक्रेत्यांच्या बाजाराला तेजी येईल असा सूचक व निश्चित इषारा दिला जात होता. ह्या इषाऱ्यापासून योग्य तो बोध समंजस इंग्लिश व इतर पश्चिमात्य कारखानदारांनीं व व्यापाऱ्यांनीं घेतला असेलच. परंतु आतां महायुद्ध संपून तीन वर्षें होऊन गेल्यामुळें विक्रेत्यांच्या बाजाराची तेजी आतां हळू हळू ओहोटीस लागली आहे असें बोललें जातें. सदरहू परिस्थितीचा हिंदी उद्योगधंदे व व्यापार यांवर काय परिणाम झाला व होणें संभवनीय आहे याचा थोडक्यांत विचार करूं.

हिंदसारख्या औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशाला विक्रेत्यांच्या बाजारपेठेच्या तेजीचा फायदा मिळणें शक्य तर नव्हतेंच पण उलट आवश्यक विक्री–मालाच्या जागतिक दुर्मिळतेमुळें, हिंदुस्थान सारख्या देशाची उत्पादनाच्या दृष्टीनें कुचंबणा होऊं लागली असा प्रत्यक्ष अनुभव गेल्या तीन वर्षांत आला. यंत्र–सामुग्री, रेल्वेचीं इंजिनें, मोटारी इ. माल पैसे देऊनहि वेळेवर मिळूं न शकल्यामुळें कांहीं कारखानदार आपले कारखाने सुरू करूं शकले नाहींत; वहातुकीसाठी इंजिनें न मिळाल्यामुळें अंतर्गत वहातुकीवर अवलंबून असणारी रेशनिंगची व्यवस्था कोलमडून पडूं लागली; वहातुकीला वॅगनी न मिळाल्यामुळें कोळसा, सिमेंट, साखर, कापड या सारख्या वस्तू उत्पादन होऊनहि लोकांना मिळूं शकल्या नाहींत; मोटारींच्या तुटवड्यामुळें उतारूंच्या वहातूकीची गैरसोय होऊं लागली. परदेशांतून यंत्रसामुग्री इ. माल मिळवण्यासाठी व्यापाऱ्यांचीं, सरकारचीं व कारखानदारांचीं शिष्टमंडळें परदेशांना भेट देऊं लागलीं. चैनीच्या विक्री–मालाच्या बाबतींत मात्र तुटवडा साधारणपणें कमी प्रमाणांत भासूं लागला. मालाच्या किंमती मात्र म्हणण्यासारख्या उतरल्या नाहींत. परंतु याहि मालाच्या बाबतींत आयातीवरील निर्बंध, परदेशी चलनाची दुर्मिळता इ. गोष्टींना हिंदी जनतेला तोंड द्यावें लागलें.

ह्याप्रमाणें हिंदुस्थानसारख्या औद्योगिक दृष्ट्या मागसलेल्या देशाला 'विक्रेत्यांच्या बाजारपेठच्या' चलतीमुळें बरीच अडचण सोसावी लागली. विशेषतः जनतेमध्यें कुवत असूनहि यंत्रसामुग्रीच्या अभावीं उत्पादन वाढवितां आलें नाहीं व कांहीं बाबतींत वहातूकीच्या अडचणीमुळें उत्पादन झालेल्या मालाची देशाच्या दूरदूरच्या भागांत वाटणी करणें कठीण जाऊं लागलें. औद्योगिक दृष्ट्या पुढें असलेल्या देशांतील कारखानदारांची पोळी पिकली. वरील सर्व देशांना मशिनरी इ. विक्री–मालाच्या उत्पादनाच्या बाबतींत मक्तेगिरी आहे, व युद्धोत्तर दडपलेल्या मागणीमुळें व औद्योगिक पुनर्घटनेच्या योजनेमुळें त्या मक्तेगिरीच्या परिस्थितीचा जास्तींत जास्त आर्थिक फायदा सदरहू देशांना मिळवितां आला.

आतां ही त्यांची अनुकूल परिस्थिति ओसरूं लागली आहे असें अर्थशास्त्रज्ञ म्हणतात परंतु जागतिक उत्पादनाची परिस्थिति लक्षांत आणली तर अजूनहि कांहीं दिवस विक्रेते तेजींत राहणार असें दिसतें. हिंदुस्थानसारख्या देशांत औद्योगिक उत्पादन मोठ्या प्रमाणांत होऊं लागलें, औद्योगिक पुनर्घटनेच्या योजना यशस्वी होऊं लागल्या, जर्मनी व जपान ह्या देशांचें औद्योगिक जीवन पुन्हा सुरू झालें म्हणजे एकंदर परिस्थिति सुधारेल.

### दि नागपूर ग्लास वर्क्स लि., नागपूर

कच्च्या मालाची व तयार मालाची वहातूक करण्याच्या अडचणींमुळें व अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळें वरील कंपनी आपलें उत्पादन तिच्या उत्पादनशक्तीच्या ५०% च करूं शकली. परंतु नोकर व इतर सामान्य खर्च कायम राहिल्याकारणानें नफ्याचा आकडा १९४६–४७ च्या नफ्यापेक्षा कमी दिसत आहे. ३१–३–४८ अखेरच्या अहवालाचे वर्षीं कंपनीस ५० हजारांची करासाठी तरतूद करून व २९½ हजार रु. घसारा काढून ७२,७७२ रु. निव्वळ नफा झाला. त्यांतून १६% डिव्हिडंड देण्यास ६४ हजार रु. लागले. उरलेले ८,७७२ रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. कंपनीनें सुमारें ६½ लक्ष रुपयांची विक्री केली. कंपनीनें दोन वर्षांपूर्वीं मागवलेली २ लक्ष रुपये किंमतीची यंत्रसामुग्री आतां आली असून नव्या इमारतींचें काम पुरें होतांच त्यांत ती बसविली जाईल. कंपनीचे चालक व कामगार ह्यांचेमधील संबंध सलोख्याचे राहिले आहेत. कंपनीनें गेल्या वर्षीं कामगारांना तीन महिन्यांच्या मजुरी-इतका बोनस, पुरेसा महागाईभत्ता, एका महिन्याच्या मजुरीइतका स्वातंत्र्यबोनस व तीन पगारी सुट्या इतकें दिलें.

कंपनीचें विक्री झालेलें व वसूल भांडवल ४ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड २ लक्ष, ४० हजारांवर आहे. कंपनीचा कारभार बहुंशीं ह्या स्वतःच्याच मालकीच्या भांडवलावर चालू आहे. घसाऱ्याची रकम सालोसाल जिंदगींतून वजा करण्याचें कंपनीचें धोरण शास्त्रशुद्ध आहे. अर्थात् त्यामुळें "घसारा फंड" मोठा दिसूं शकत नाहीं. श्रीमंत माधवराव देशपांडे, बी. ए., मालगुजार, नागपूर हे कंपनीचे चेअरमन असून तिच्या डायरेक्टर बोर्डांत नागपूर मधील सुप्रसिद्ध व वजनदार मंडळी आहेत. डी. पी. ओगले आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. ४ जुलै, १९४८ रोजीं झाली.



**कूळ कायदा**

आवृत्ति ३ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.

| | |
|---|---|
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. १ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा | कापडी किं. ४॥ रु. / कागदी किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनी तयार केलीं आहेत.

पत्ता--लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.



मुंबई हायकोर्टाचा ताजा निवाडा

## सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोंदलेल्या संस्थांनीं पब्लिक ट्रस्ट ॲक्टाखाली नोंदविण्याचें कारण नाहीं.

अनाथ विद्यार्थि गृहाच्या नाशिक शाखेचे मॅनेजर, श्री. भा. स. जोशी ह्यांचेवर १३ डिसेंबर, १९४४ रोजीं नाशिकच्या सिव्हिल जज्जानें ( बॉंबे पब्लिक टस्ट्र रजिस्ट्रेशन ॲक्टाच्या ४ थ्या कलमाप्रमाणें तो रजिस्ट्रारहि आहे ) नोटीस काढून, "लोकसत्ते" मधील जाहिरनाम्याप्रमाणें व्यवस्था न केल्याबद्दल काम कां चालविण्यांत यऊं नये ह्याचीं कारणें मागितलीं. श्री. जोशी ह्यांनीं २५ फेब्रुवारी १९४७ रोजीं रजिस्ट्राराला निवेदन केलें कीं :अनाथ विद्यार्थि गृह ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं असोसिएशन म्हणून नोंदण्यांत आलेली आहे; तिचा उद्देश गरीब हिंदु विद्यार्थ्यांचा निर्वाह व शिक्षण करून त्यांचे उपयुक्त सामाजिक कार्यकर्ते तयार करणें हा आहे; ती रिलिजस ट्रस्टखाली येत नाहीं; पब्लिक ट्रस्ट असेंहि तिला मानतां येत नाहीं; ॲक्टाखाली ती नोंदण्याचें कारण नाहीं. तथापि, रजिस्ट्रारनें अ. वि. गृहाची नाशिक शाखा पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ॲक्टाखाली नोंदविली पाहिजे, असा निकाल दिला. त्यावर हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज करण्यांत आला. हायकोर्टाचा निवाडा खालीं दिला आहे.

" सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टाखाली नोंदलेल्या संस्थेची परिस्थिति क्लब अथवा जॉइंट स्टॉक कंपनीसारखी असल्यानें, तिच्या अंतर्गत व्यवस्थेंत बाहेरून हस्तक्षेपास वाव असण्याचें कारण नाहीं. नोंदलेल्या संस्थेच्या घटनेंत व नियमांत तिच्या मालमत्तेच्या व्यवस्थेसंबंधीं तरतूद असतेच. तिचेवर दावा लावतां येतो व त्याहि दावा लावूं शकतात. तिच्या पैशाचे व्यवहारांत कांहीं गैर घडलें तर सोसायटीविरूद्ध दावा लावून न्याय मिळवितां येतो. अशा संस्थांची सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदण्याची योजना केल्यानंतर, त्यांना पुनः बॉंबे पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ॲक्टाचे कक्षेंत आणण्याचा विधिमंडळांचा उद्देश असणें संभवत नाहीं. आतांपर्यंत, सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदलेल्या कोणत्याहि संस्थेस बॉंबे पब्लिक ट्रस्ट्स रजिस्ट्रेशन ॲक्टखालीं नोंदविण्यास सांगण्यांत आलेलें दिसत नाहीं. अ. वि. गृहाची मुख्य कचेरी पुणें येथें आहे. ती बॉ. प. ट्र. र. ॲक्टखाली नोंदलेली नाहीं. त्याचप्रमाणें, ह्या प्रांतांतील कित्येक शैक्षणिक सोसायट्यांना तसें नोंदवून घेण्यास सांगण्यांत आलेलें नाहीं. तेव्हां, प्रस्तुत संस्थेस (अ. वि. गृहाची नाशिक शाखा) बॉंबे रजिस्ट्रेशन ॲक्टाचीं कलमें लागू पडत नाहींत व म्हणून त्या संस्थेस ह्या ॲक्टखालीं नोंदवून घेण्यास सांगणारा हुकूम रद्द करण्यांत येत आहे."

**मि. फोर्ड ह्यांची इस्टेट**—सुप्रसिद्ध मोटार–कोट्याधीश मि. हेन्री फोर्ड हे एप्रिल, १९४७ मध्यें निवर्तले. त्यांनीं आपल्या मागें सुमारें १७५ कोटी रुपयांची इस्टेट ठेवली आहे, ती फोर्ड फौंडेशन ही धर्मादाय संस्था व मि. फोर्ड ह्यांचे चौवे नातू ह्यांत वांटून देण्यांत आली आहे.

**"संस्कृतला राष्ट्रभाषा करा"**—आंध्र विद्यापठाचे उपकुलगुरू डॉ. सी. आर. रेड्डी, ह्यांनीं हिंदुस्थानची राष्ट्रभाषा संस्कृत असावी, असें सुचविलें आहे. इंग्रजीची जागा संस्कृत घेऊं शकेल व दळणवळणाची भाषा हिंदी राहूं शकेल, असें त्यांचें मत आहे.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमची वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर



## दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

**( स्थापना सन १९२७ )**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,५४,३५० रु. |
| भरलेलें भांडवल | ८८,००० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०७,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्याचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/– चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/– ( रु. ५/– प्रिमीयम् म्हणून व रु. २०/– अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. १०/– ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/– चा. एक या प्रमाणें १ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यामधील अंतर १ महिन्याचेपेक्षां कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर


• हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. [illegible] वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.